ठाणे, सोमवार दि. २० मे २०२४ वर्ष : १३, अंक : २२, पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

दैनिक लोकसभेचा संग्राम

# महाराष्ट्र सम्राट

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !®

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर आणि पुणे येथून प्रसिद्ध

संपादक : चंद्रकांत भोईटे



दैनिक महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !
संपादक : गणेश चंद्रकांत भोईटे



## महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि.

- जागा : ५३४७
- पदाचे नाव: विद्युत सहाय्यक
- शैक्षणिक पात्रता: (i) १०+२ बंधातील माध्यमिक शालांत परीक्षा (१०वी) (ii) ITI (विजतंत्री/तारतंत्री (Electrician / Wireman) किंवा महाराष्ट्र राज्य व्यवसाय परीक्षा मंडळ यांनी प्रमाणित केलेले ०२ वर्षांचा पदविका (Electrician / Wireman) अभ्यासक्रम प्रमाणपत्र.
- वयाची अट: २९ डिसेंबर २०२३ रोजी १८ ते २७ वर्षे मागासवर्गीय/आ.दु.घ.: ०५ वर्षे सूट
- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
- फी : खुला प्रवर्ग: २५०/- मागासवर्गीय/आ.दु.घ./अनाथ: १२५/-
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: २० मे २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://www.mahadiscom.in/

## हिंदुस्थान उर्वरक आणि रसायन लिमिटेड

- जागा : ८०

१ मॅनेजर / (L2)
२ इंजिनिअर/ (L-1)
३ ऑफिसर/ (L-1)
४ चीफ मॅनेजर/ (L-3)
५ असिस्टंट मॅनेजर/(L1) FTC
६ ऑफिसर/(L1) FTC

- शैक्षणिक पात्रता:

पद क्र.१: (i) ६०% गुणांसह इंजिनिरिंग पदवी/B.Sc. (-gri)+ M.Sc./CA/CMA (ii) १२ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) ६०% गुणांसह इंजिनिरिंग पदवी (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.३: (i) ६०% गुणांसह इंजिनिरिंग पदवी/ MBA/CA/CMA (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.४: (i) CA/CMA/ PGDM²/ MBA (Finance) (ii) १९ वर्षे अनुभव
पद क्र.५: (i) ६०% गुणांसह पदवी/PG डिप्लोमा (Communication/ -dvertising Communication Management/Public Relations/ Mass Communication/ Journalism) किंवा MBA/MSW किंवा B.Sc. (Agri)+ M.Sc.(Agriculture) किंवा BSc.Agri/B.Tech+ MBA/PGDBM² (ii) ०७ वर्षे अनुभव
पद क्र.६: (i) LLB (ii) ०५ वर्षे अनुभव

- वयाची अट: २० मे २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट

पद क्र.१: ४० वर्षांपर्यंत
पद क्र.२: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.३: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.४: ४७ वर्षांपर्यंत
पद क्र.५: ४५ वर्षांपर्यंत
पद क्र.६: ३५ वर्षांपर्यंत

- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
- फी : फी नाही.
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: २० मे २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://hurl.net.in/

# महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड़ यांनी केली कल्याण मधील मतदार संघातील मतदान केंद्रांची पाहणी





कल्याण - दि. २० मे २०२४ रोजी संपन्न होत असलेल्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड़ यांनी आज ❋कल्याण मधील जाईबाई शाळा,मॉडर्न कॉलेज, राजभर स्कुल व परिसरातील इतर मतदान केंद्रांतील व्यवस्थेबाबत पाहणी केली.

मतदान केंद्रात प्रामुख्याने मतदान अधिकारी, कर्मचारी तसेच मतदारांसाठी स्वच्छ शौचालयांची व्यवस्था, त्याचप्रमाणे मतदान केंद्रा बाहेर उन्हाची तीव्रता लक्षात घेता मतदान केंद्रात वायु वीजनाची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सोय मंडपाची व्यवस्था, दिव्यांग मतदारांसाठी रॅम्पची तसेच व्हीलचेअरची व्यवस्थ योग्य रीतीने असल्याबाबत त्याचप्रमाणे मतदान केंद्राभोवतालचा परिसर स्वच्छ असल्याबाबत पाहणी करीत, मतदारांसाठी सर्व मतदान केंद्रे सुसज्य असल्याची आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी खातरजमा केली. महापालिका परिक्षेत्रातील नागरिकांनी उद्या म्हणजे दिनांक २० मे रोजी मतदान करून आपला मतदानाचा हक्क बजवावा असे आवाहनही आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड यांनी यावेळी केले.

यासमयी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त मंगेश चितळे, उपायुक्त धैर्यशील जाधव, विभागप्रमुख (माहिती व जनसंपर्क) संजय जाधव, कार्यकारी अभियंता जगदिश कोरे, ५/ड प्रभागाचे सहा.आयुक्त धनंजय थोरात उपस्थित होते.

## आर्ममेंट रिसर्च डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंट

- जागा : २०
- ज्युनियर रिसर्च फेलो
- रिसर्च असोसिएट
- शैक्षणिक पात्रता:

पद क्र.१: प्रथम श्रेणी BE/B.Tech+NET/ GATE किंवा प्रथम श्रेणी M.Sc+NET
पद क्र.२: (i) PhD (ii) ME/M.Tech (iii) ०३ वर्षे अनुभव
वयाची अट: २८ वर्षांपर्यंत SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट

- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: पुणे
- अर्ज पाठविण्याचा पत्ता: The Director, Armament Research Development Establishment (ARDE), Armament Post, Pashan, Pune-411021
- अर्ज पोहचण्याची शेवटची तारीख: ३१ मे २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://www.drdo.gov.in/drdo/labs-and-establishments/armament-research-development-establishment-arde

## भारतीय हवाई दलात अग्निवीरवायु (संगीतकार) पदाची भरती

- कोर्सचे नाव: अग्निवीरवायु इनटेक ०१/२०२५

जागा : पद संख्या तूर्तास निर्दिष्ट नाही.
पदाचे नाव: अग्निवीरवायु (संगीतकार)

- शैक्षणिक पात्रता: (i) १०वी उत्तीर्ण (ii) संगीत अनुभव प्रमाणपत्र/डिप्लोमा
- शारीरिक पात्रता: उंची/छाती पुरुष महिला , उंची १६२ सेमी १५२ से.मी.

छाती ७७ से.मी./किमान ०५ सेमी फुगवून. -
वयाची अट: जन्म ०२ जानेवारी २००४ ते ०२ जुलै २००७ दरम्यान.

- वय गणकयंत्र: वय मोजा
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०५ जून २०२
- मेळाव्याचा कालावधी: ०३ ते १२ जुलै २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://indianairforce.nic.in/

## इंडियन आर्मी डेंटल कॉर्प्स भरती २०२४

- पदाचे नाव: शार्ट सर्विस कमिशन ऑफिसर
- शैक्षणिक पात्रता: (i) ५५% गुणांसह BDS/MDS (ii) एक वर्षाची रोटेटरी इंटर्नशिप पूर्ण (iii) NEET (MDS)-२०२४
- वयाची अट: ३१ डिसेंबर २०२४ रोजी ४५ वर्षांपर्यंत.
- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०५ जून २०२४
- अधिकृत वेबसाईट : https://www.indianarmy.nic.in/

# ज्येष्ठ नेते प्रतापराव भोसले यांचे निधन

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रतापराव भोसले यांचे वयाच्या नव्वदाव्या वर्षी वृद्धापकाळाने भुईंज जिल्हा सातारा येथील निवासस्थानी आज पहाटे निधन झाले.

भुईंज गावचे सरपंच म्हणून राजकीय कारकिर्दीला प्रारंभ करणाऱ्या प्रतापराव भोसले यांनी ४ वेळा आमदार म्हणून वाई खंडाळा विधानसभा मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करताना कॅबिनेट मंत्री म्हणून यशस्वी काम केले. त्यानंतर ज्येष्ठ नेते यशवंतराव चव्हाण यांच्या निधनाने रिक्त झालेल्या सातारा लोकसभा मतदार संघातून ३ वेळा संसदेत खासदार म्हणून प्रतिनिधीत्व केले. या काळात विविध राष्ट्रीय समित्यांवर महत्वपूर्ण जबाबदाऱ्या पार पाडल्या. त्यानंतर त्यांनी १९९७ साली महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारून गेलेली सत्ता पुन्हा आणून महाराष्ट्रात काँग्रेसच्या नेतृत्वाखाली आघाडीचे सरकार स्थापन केले.

या कालावधीत ज्येष्ठ नेते यशवंतराव चव्हाण, देशभक्त आबासाहेब वीर यांच्या नेतृत्वाखाली काम करताना धोम, कण्हेर धरण, किसन वीर सातारा सहकारी साखर कारखाना, जनता शिक्षण संस्थेच्या उभारणीसह कृषी, सहकार क्षेत्रासह संस्थात्मक कामकाजात मोलाचे योगदान दिले.

अत्यंत सुसंस्कृत, चारित्र्यसंपन्न, विचारांची पक्की बैठक आणि स्वाभिमान जपणारे नेतृत्व म्हणून त्यांची महाराष्ट्राला ओळख होती. प्रतापराव भोसले यांच्या पश्चात माजी आमदार मदन भोसले, मोहनराव भोसले, गजानन भोसले हे तीन सुपुत्र, विवाहित कन्या पद्मादेवी पाटील, सूना, नातवंडे, परतुंडे असा परिवार आहे.

आज दुपारी ४ वाजता प्रतापराव भोसले यांची अंत्ययात्रा निघणार असून दुपारी ५ वाजता भुईंज येथे देगाव रस्त्यावरील त्यांच्या शेतात रात्री अंत्यसंस्कार करण्यात आले



### काँग्रेस संस्कृतीचा खांब निखळला

सातारा जिल्ह्यातील काँग्रेस वाढविण्यासाठी भाऊंच्या माध्यामातून यशवंत विचारांची ज्योत अखेरच्या क्षणापर्यंत तेवत ठेवण्याचे काम आदरणीय प्रतापराव भोसले यांनी केले असून त्यांच्या विचारांची ही ज्योत कायमस्वरूपी पुढे नेण्यासाठी आम्ही सर्व जिल्हावासी कटिबद्ध राहू अशी श्रद्धांजली अर्पण करतो......

– बाबासाहेब कदम
ज्येष्ठ काँग्रेस कमिटी कार्यकर्ते

# ६६,७८,४७६ मतदारांना बजावता येणार मतदानाचा हक्क

ठाणे : ठाणे जिल्ह्यातील २३ भिवंडी, २४ कल्याण व २५ ठाणे या लोकसभा मतदारसंघात एकूण सुमारे ६६ लाख ७८ हजार ४७६ मतदारांना येत्या २० मे २०२४ रोजी मतदानाचा हक्क बजावता येणार आहे. मतदानासाठी जिल्ह्यात तीनही लोकसभा मतदारसंघ मिळून एकूण ६६०४ मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत. आज या मतदान केंद्रामध्ये साहित्य पोचविण्याचे काम करण्यात येत आहे. नागरिकांनीही मतदार यादीत नाव तपासून आपल्या मतदान केंद्रावर जाऊन मतदान करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे यांनी केले आहे.

ठाणे जिल्ह्यात २३ भिवंडी, २४ कल्याण व २५ ठाणे लोकसभा मतदारसंघ आहेत. या मतदारसंघातील मतदानासाठी सर्व यंत्रणा सज्ज झाली आहे.

ठाणे जिल्ह्यातील लोकसभा मतदारसंघनिहाय व विधानसभा मतदारसंघनिहाय मतदारांची संख्या पुढील प्रमाणे -

२३-भिवंडी लोकसभा मतदारसंघ - एकूण मतदार - २०८७६०४ (पुरुष मतदार-११२९७१४, महिला मतदार-९५७१९१, तृतीय पंथी मतदार-३३९, सेवा मतदार-३६०).

## विधानसभा मतदारसंघ निहाय मतदारांची संख्या

### १३४-भिवंडी ग्रामीण विधानसभा मतदारसंघ

एकूण मतदार - ३२४०४६ (पुरुष मतदार-१६८३२९, महिला मतदार-१५५६३८, तृतीय पंथी मतदार-११, सेवा मतदार-६८).

- १३५-शहापूर विधानसभा मतदारसंघ
एकूण मतदार - २७९१७६ (पुरुष मतदार-१४३४०२, महिला मतदार-१३५७३५, तृतीय पंथी मतदार- ०, सेवा मतदार-३९).
- **१३६-भिवंडी पश्चिम विधानसभा मतदारसंघ**
एकूण मतदार - ३०४९७५ (पुरुष मतदार-१७६४९९, महिला मतदार-१२८३३८, तृतीय पंथी मतदार- १२२, सेवा मतदार-१६)
- १३७-भिवंडी पूर्व विधानसभा मतदारसंघ
एकूण मतदार - ३३६१२४ (पुरुष मतदार-१९८०४४, महिला मतदार-१३७८८७, तृतीय पंथी मतदार- १७९, सेवा मतदार-१४)
- १३८-कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघ
एकूण मतदार - ४००२७८ (पुरुष मतदार-२१२६१२, महिला मतदार-१८७५१४, तृतीय पंथी मतदार- १२, सेवा मतदार-१४०).
- १३९-मुरबाड विधानसभा मतदारसंघ
एकूण मतदार - ४४३००५ (पुरुष मतदार-२३०८२८, महिला मतदार-२१२०७९, तृतीय पंथी मतदार- १५, सेवा मतदार-८३).

### २४-कल्याण लोकसभा मतदारसंघ

एकूण मतदार - २०८२८०० (पुरुष मतदार-१११७४१४, महिला मतदार-९६४०२१, तृतीय पंथी मतदार-७८६, सेवा मतदार-५७९).

**विधानसभा मतदारसंघ निहाय मतदारांची संख्या**

- १४० - अंबरनाथ विधानसभा मतदारसंघ
एकूण मतदार - ३५३६६१ (पुरुष मतदार-१८९८४४, महिला मतदार-१६३६५४, तृतीय पंथी मतदार- ५६, सेवा मतदार-१०७).
- १४१-उल्हासनगर विधानसभा मतदारसंघ
एकूण मतदार - २५७४७७ (पुरुष मतदार-१३९८४८, महिला मतदार-११७४२२, तृतीय पंथी मतदार- ९७, सेवा मतदार-११०).
- १४२-कल्याण पूर्व विधानसभा मतदारसंघ
एकूण मतदार - २९९५१८ (पुरुष मतदार-१५९२८९, महिला मतदार-१३९६८४, तृतीय पंथी मतदार- ४०७, सेवा मतदार-१३८).
- १४३-डोंबीवली विधानसभा मतदारसंघ
एकूण मतदार - २७५१७२ (पुरुष मतदार-१४३१९६, महिला मतदार-१३१९१४, तृतीय पंथी मतदार- ०, सेवा मतदार-६२).
- १४४-कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघ
एकूण मतदार - ४५३२२१ (पुरुष मतदार-२४८१२४, महिला मतदार-२०४९०२, तृतीय पंथी मतदार- १२३, सेवा मतदार-७२)
- १४९-मुंब्रा कळवा विधानसभा मतदारसंघ
एकूण मतदार - ४४३७५१ (पुरुष मतदार-२३७११३, महिला मतदार-२०६४४५, तृतीय पंथी मतदार- १०३, सेवा मतदार-९०).

### २५ - ठाणे लोकसभा मतदारसंघ❋

एकूण मतदार - २५०८०७२ (पुरुष मतदार-१३४८१६३, महिला मतदार-११५९००२, तृतीय पंथी मतदार-२०७, सेवा मतदार-७००).

**विधानसभा मतदारसंघ निहाय मतदारांची संख्या**

- १४५- मीरा भाईंदर विधानसभा मतदारसंघ
एकूण मतदार - ४५७३९१ (पुरुष मतदार-२४२९६६, महिला मतदार-२१४३८९, तृतीय पंथी मतदार- ४, सेवा मतदार-३२)
- १४६-ओवळा माजीवाडा विधानसभा मतदारसंघ
एकूण मतदार - ५०९३४६ (पुरुष मतदार-२७३२७२, महिला मतदार-२३५९२८, तृतीय पंथी मतदार- २७, सेवा मतदार-११९).
- १४७-कोपरी पाचपाखाडी विधानसभा मतदारसंघ
एकूण मतदार - ३२८१८५ (पुरुष मतदार-१७५५६१, महिला मतदार-१५२४७२, तृतीय पंथी मतदार- २१, सेवा मतदार-१३१)
- १४८-ठाणे विधानसभा मतदारसंघ❋
एकूण मतदार - ३५७६८४ (पुरुष मतदार-१८५८५७, महिला मतदार-१७१६८१, तृतीय पंथी मतदार- ७, सेवा मतदार-१३९).
- १५०-ऐरोली विधानसभा मतदारसंघ❋
एकूण मतदार - ४५७६११ (पुरुष मतदार-२५७६११, महिला मतदार-१९९७१५, तृतीय पंथी मतदार- १३०, सेवा मतदार-१५५).
- १५१- बेलापूर विधानसभा मतदारसंघ❋
एकूण मतदार - ३९७८५५ (पुरुष मतदार-२१२८९६, महिला मतदार-१८४८१७, तृतीय पंथी मतदार- १८, सेवा मतदार-१२४).

# ठाणे जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रावर पुरेशा प्रमाणात विविध सोयी सुविधा उपलब्ध : अशोक शिनगारे

ठाणे : ठाणे जिल्ह्यातील २३ भिंवडी, २४ कल्याण, २५ ठाणे लोकसभा मतदारसंघातील एकूण १८ विधानसभा मतदारसंघाच्या विविध मतदान केंद्रांवर २० मे २०२४ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान होणार आहे. मतदारांना आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडताना कोणतीही असुविधा होऊ नये, यासाठी जिल्हा प्रशासन व निवडणूक प्रशासनाने प्रत्येक मतदान केंद्रांवर विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. या सुविधांचा लाभ घेऊन नागरिकांनी मोठ्या प्रमाणात मतदान करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे व उपजिल्हा निवडणूक अधिकारी अर्चना कदम यांनी केले आहे.

जिल्ह्यातील तीनही मतदारसंघात मिळून ६६०४ मतदान केंद्रे आहेत. दिव्यांग, ज्येष्ठ नागरिकांना सोईचे व्हावे, यासाठी सर्वच मतदान केंद्रे तळमजल्यावर आणली आहेत. तसेच ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगासाठी रॅम्प, पिण्याच्या पाण्याची सुविधा, स्वच्छतागृह, फर्निचर व्यवस्था, पुरेशी प्रकाश व्यवस्था, दिशादर्शक फलक, मतदान केंद्रावर सावली, पाळणाघर, मार्गदर्शक फलक, मतदान सहाय्यता केंद्र, प्रथमोपचार पेटी, रांगेचे व्यवस्थापन आदी व्यवस्था जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी अशोक शिनगारे यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक विभागाकडून करण्यात आली आहे.

मतदान केंद्र असलेल्या ठिकाणी १:१२ उतार असलेला रॅम्प उभारण्यात आले आहे, जेणेकरुन जेष्ठ नागरिक व दिव्यांग मतदारांना मतदान करणे सोयीचे होईल. मतदान केंद्रावर नळाचे शुध्द पाणी उपलब्ध होण्यासाठी पिण्याच्या पाण्याची सुविधेची व्यवस्था करण्यात आली आहे. मतदानाच्या दिवशी प्रत्येक मतदान केंद्रावर किमान १०० लिटर थंड पिण्याचे पाणी व पाणी पिण्यास पर्यावरण पूरक ग्लास ठेवण्यात येणार असून यासाठी एका स्वयंसेवकाची नेमणूक केली आहे.

मतदान केंद्रावर महिला मतदार व पुरुष मतदार यांच्यासाठी स्वतंत्र, पक्के, स्वच्छ व पुरेशा पाण्याची सोय असलेले स्वच्छतागृह उपलब्ध असणार आहेत. जेथे पक्क्या स्वरुपाचे स्वच्छतागृह उपलब्ध नसेल तेथे मोबाईल टॉयलेट व्हॅन संबंधित महानगरपालिका / नगरपालिका /नगरपरिषद यांच्याकडून उपलब्ध करुन घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. स्वच्छतागृहाची स्वच्छता ठेवण्यासाठी मतदानाच्या दिवशी स्वच्छता कर्मचारी याठिकाणी उपस्थित असणार आहेत.

उमेदवार प्रतिनिधींसाठी त्याचबरोबर निवडणुकीचे कामकाज करणाऱ्या कर्मचारी वर्गासाठी पुरेशा प्रमाणात टेबल, खुर्च्या व रांगेतील उभा असणाऱ्या मतदारांना बसण्यासाठी मतदान केंद्रावर पुरेसे खुर्च्या / बाक उपलब्ध करून देण्याची व्यवस्था सर्व ठिकाणी करण्यात आली आहे. मतदान केंद्रावर पुरेशी प्रकाश व्यवस्था व पंखे उपलब्ध केले जाणार आहे तसेच मतदान केंद्रावरील वीज कनेक्शन सुरु असल्याबाबत खात्री करण्यात आली आहे.

मतदारांना मतदान केंद्र सापडावे, यासाठी किमान ४ दिशादर्शक फलक लावण्यात आले आहेत. हे दिशादर्शक फलक संबंधित मतदान केंद्रात नोंदणी असलेल्या मतदार राहत असलेल्या ठिकाणी प्रमुख चौकात लावण्यात आले आहेत. मतदान केंद्रावर मतदान केंद्राच्या ठिकाणाचा ले आऊट व सुविधा जसे स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, मतदान सहाय्यता केंद्र असे फलक लावण्यात आले आहेत.

मतदान केंद्रावर रांगेतील उभ्या मतदारांना ऊन लागू नये यासाठी मंडप उभारण्यात आले आहेत. मतदान केंद्राच्या ठिकाणी पाळणाघर असावे या उद्देशाने मतदान केंद्रावर मुलांची काळजी घेण्यासाठी प्रशिक्षित कर्मचारी व स्वयंसेवक यांची नेमणूक करण्यात आली आहे.

प्रत्येक मतदान केंद्रावर मतदारांचा यादीतील नाव, भाग क्रमांक, अनुक्रमांक तसेच कोणते मतदान केंद्र आहे हे कळावे यासाठी बीएलओ व त्याची टिम मतदान केंद्रावर उपस्थित राहणार आहेत. मतदार सहाय्यता केंद्रातही पुरेशा प्रमाणात सुविधा देण्यात आल्या आहेत.

मतदान केंद्रावर पुरेश्या औषध साठ्यासह आरोग्य कर्मचारी उपस्थित राहणार आहेत. सध्या उष्णतेची लाट असल्याने पुरेसे ओआरएस (ORS) व ग्लुकोज (Glucose) पावडर याठिकाणी उपलब्ध असणार आहे. तसेच हिट स्ट्रोक (Heat stroke) टाळण्यासाठी काय करावे, याचे माहितीपत्रक सर्व निवडणूक विषयक कर्मचारी यांना देण्यात येणार आहे. सेक्टर ऑफिसर सोबतही एक आरोग्य कर्मचारी, प्रथमोपचार पेटी (Medical Kit) सह उपलब्ध ठेवण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे तालुक्यात प्रत्येक एक तासांनी प्रत्येक मतदार केंद्रावर पोहचेल, अश्या पध्दतीने एक वैद्यकीय कर्मचारी उपलब्ध ठेवण्यात येणार आहे.

मतदारांना सोबत डोक्यावर ओला रुमाल, कपडा आणण्यासाठी व शक्यतो लहान मुलांना सोबत घेऊन येऊ नये, असे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात येत आहे.

### प्रत्येक केंद्रावर स्वयंसेवकाची नियुक्ती

प्रत्येक मतदान केंद्रावर प्रतिक्षा रांगेतील मतदारांचे नियोजन करण्यासाठी राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी)/एनएसएस/ स्काऊट व गाईडचे स्वयंसेवक उपलब्ध ठेवण्यात येणार आहेत. त्याचबरोबर दिव्यांग व जेष्ठ नागरिकांना मतदार केंद्रावर पोहचण्यासाठी स्वयंसेवकांनी मदत करतील. स्वयंसेवकांना योग्य ते प्रशिक्षण देण्यात आले आहे.

पुरुष मतदार, महिला मतदार, दिव्यांग व जेष्ठ नागरिक मतदार अशा वेगवेगळ्या रांगा मतदान केंद्रावर असणार असून एक पुरुष मतदारांमागे दोन महिला मतदारांना मतदान करण्यासाठी सोडण्यात येणार आहे. दिव्यांग मतदारांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल. त्यांना रांगेमध्ये वाट पहायला लावू नये, याची काळजी घेण्यात येणार असून मतदान केंद्रावरील स्वयंसेवकाची मदत त्यांच्यासाठी उपलब्ध असणार आहे. त्याचप्रमाणे गरोदर माता, लहान मुले असलेल्या स्त्रिया यांनाही मतदानासाठी प्रथम प्राधान्य असेल. रांगेच्या ठिकाणी मतदारांना बसण्यासाठी थोड्या-थोड्या अंतरावर खुर्चा / बाक ठेवण्यात येणार आहे. रांगेचे योग्य व्यवस्थापन करून सर्व मतदारांना दिव्यांग व जेष्ठ नागरीक यांना सहकार्य करण्यास स्वयंसेवक मदत करतील, अशी माहिती मतदान केंद्र सुविधेच्या नोडल अधिकारी तथा जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रुपाली सातपुते यांनी दिली आहे.

जिल्ह्यातील मतदारांची गैरसोय होणार नाही, याची दक्षता घेण्यासाठी ठाणे जिल्हा प्रशासान विविध उपाययोजना राबवित आहे. मतदारांनी या सर्व सोयी सुविधेचा लाभ घ्यावा. तसेच मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन जिल्हा प्रशासन मार्फत करण्यात आले आहे.


# मुंबई, ठाण्यात प्रचंड उकाडा, घामाच्या धारा

**मुंबई: गेल्या दोन दिवसांपासून मुंबई शहर, उपनगर, ठाणे, नवी मुंबई, डोंबिवलीच्या परिसरात प्रचंड उकाडा जाणवत आहे. सतत घामाच्या धारा लागत असल्याने नागरिक हैराण झाले आहेत. त्यामुळे हा उकाडा कधी कमी होणार, याची अनेकजण वाट पाहत आहेत. या पार्श्वभूमीवर हवामान खात्याकडून नवा अंदाज जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार मुंबईतील तापमानात रविवारीही फारसा फरक पडणार नाही. त्यामुळे हवेतील उकाडा कायम राहील. तसेच कमाल तापमान ३६ अंश सेल्सिअसच्या पुढे जाण्याचा अंदाजही वर्तवण्यात आला आहे.**

काही दिवसांपूर्वी मुंबईत जोरदार पाऊस पडला होता. मात्र, काहीवेळासाठी पडलेल्या पावसाने मुंबईच्या हवेतील आद्रर्ता वाढायला सुरुवात झाली होती. गेल्या दोन दिवसांपासून मुंबईच्या हवेत आर्द्रतेचे प्रमाण ८० टक्क्यांपेक्षा अधिक आहे. त्यामुळे हवेतील उकडा मोठ्याप्रमाणावर वाढला आहे. मुंबईत शनिवारी कडक उन्हाचे चटके आणि प्रचंड उष्मा जाणवत होता. यामुळे मुंबईकर हैराण झाले होते. ही परिस्थिती आणखी दोन दिवस कायम राहण्याची शक्यता आहे. मुंबई, पालघर, ठाणे जिल्ह्यात रविवारी आणि सोमवारी वातावरण उष्ण आणि दमटच राहील. त्यामुळे दोन्ही दिवस नागरिकांना प्रचंड उकाड्याचा त्रास सहन करावा लागणार आहे.

### मान्सून महाराष्ट्रात कधी येणार ?

आता सर्वांनाच प्रतिक्षा असलेल्या मान्सूनचं आज अंदमानात आगमन झालं आहे. हवामान विभागाने सर्वांना आनंदाची बातमी दिली आहे. अंदमान-निकोबार, मालदीव आणि कोमोरीन भागात मान्सूनचं आगमन झालं आहे. हवामान विभागानं याबात माहिती दिली असून, यानुसार ३१ मे रोजी मान्सून केरळच्या किनारपट्टीवर दाखल होईल. तर महाराष्ट्रात मान्सून ११ जूनला दाखल होईल असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. तसंच यावर्षी पाऊस जवळपास १०६ टक्के होण्याचा अंदाजही वर्तवण्यात आला आहे.



**तापमान 36° से.चा टप्पा ओलांडणार**

## हवामान खात्याचा महत्त्वाचा अलर्ट


### मुंबईत शनिवारी किती तापमान होते ?

मुंबईतील कुलाबा केंद्रात शनिवारी ३४.४ अंश सेल्सिअस, तर सांताक्रुझ केंद्रात ३४.९ अंश सेल्सिअसची नोंद झाली. येत्या दोन दिवसांत तापमानाचा पारा ३६ अंश सेल्सिअसच्या पार जाण्याची शक्यता आहे.

# आज राज्यात लोकसभेचे पाचव्या टप्प्यातील मतदान

**मुंबई -मुंबईतील ६ जागांसह राज्यातील धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे या लोकसभा मतदारसंघात आज (सोमवारी) मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. दरम्यान, मतदानाच्या पार्श्वभूमीवर वाहतूक यंत्रणेकडून महत्वाच्या सूचना जारी करण्यात आल्या आहेत. ठाणे शहर, मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात लोकसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने ठाणे व पालघर लोकसभा मतदारसंघात सोमावारी मतदान होणार आहे. पुणे, कोकण, गोवा, बाजूकडून येणाऱ्या वाहनाचा मुंबई व गुजरातच्या दिशेने वाहनाचा ओघ मोठ्या प्रमाणात असतो. त्यामुळे नवी मुंबई पोलीस आयुक्तालया मार्फत वाहतूक नियंत्रण अधिसूचना काढण्यात आली आहे. त्यानुसार पुणे-मुंबई द्रुतगतीवर अवजड वाहतुकीला बंदी घालण्यात आली आहे.**

## पुणे-मुंबई द्रुतगतीवर अवजड वाहतुकीला बंदी



### पुणे-मुंबई द्रुतगती मार्गाच्या दिशेने प्रवास करू नये

वाहतुकीबाबतच्या अधिसूचनेनुसार, दिनांक २०/५/२०२४ रोजी सकाळी ०६.०० वा. पासून ते २४:०० वाजेपर्यंत या कालावधीत नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत सर्व प्रकारच्या जड अवजड, मालवाहतूक करणाऱ्या वाहनांना प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे. शहराचे सर्व मार्गावरून मार्गस्थ होण्यास, प्रवेश करण्यास आणि वाहने उभी (पार्क) करण्यास पूर्णत: बंदी राहील, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. वाहतूक नियंत्रण अधिसूचनेनुसार नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत प्रवेश नसल्याने जड अवजड वाहनांनी (दि. २०)रोजी ०६.०० वाजता पासून २४.०० वाजेपर्यंत पुणे-मुंबई द्रुतगती मार्गाच्या दिशेने प्रवास करू नये, अशी सूचना जारी करण्यात आली आहे.

### राज्यातील १३ जागांसाठी होणार मतदान

मुंबईतील ६ जागांसह राज्यातील धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे या लोकसभा मतदारसंघात मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. कल्याण आणि ठाणे लोकसभा मतदारसंघात ठाकरेंची शिवसेना वि. शिंदेंची शिवसेना असा सामना आहे. तर भिवंडी आणि दिंडोरीची जागा महाविकास आघाडीमध्ये शरद पवारांच्या राष्ट्रवादीला मिळाली होती.

### अनेक दिग्गज नेत्यांची प्रतिष्ठा पणाला...

आजची निवडणुक ही चूरसी व प्रतिष्ठेची ठरणार आहे. मुंबईतील सहा जागांपैकी ४ जागांवर शिवसेना विरूध्द शिवसेना अशी टक्कर होणार आहे, कल्याण आणि ठाणे लोकसभा मतदारसंघात ठाकरेंची शिवसेना वि. शिंदेंची शिवसेना असा सामना आहे. तर भिवंडी आणि दिंडोरीची जागा महाविकास आघाडीमध्ये शरद पवारांच्या राष्ट्रवादीला मिळाली आहे.



आज होणाऱ्या लोकसभेचे निवडणुकीतील पाचव्या टप्प्याचे मतदान असल्यामुळे मतदान केंद्रावर निवडणूक आयोगातर्फे योग्य ती खबरदारी घेतली जात आहे. मतदाता मतदान केंद्रावर येण्यापूर्वीची तयारीसाठी सुरू असलेली लगबघ.... याचे क्षणचित्र...

# मतदानाच्या आदल्यादिवशीच 'प्रिसायडिंग ऑफिसर'चा मृत्यू; होमगार्डला हृदयविकाराचा झटका

मुंबई : राज्यातील पाचव्या आणि शेवटच्या टप्प्यात निवडणूक होत असून २० मे रोजी मतदान प्रक्रिया पार पडत आहे. त्यासाठी, प्रशासनाकडून सर्वच स्तरावर कार्यवाही केली जात असून निवडणूक अधिकाऱ्यांचं काम आजपासूनच सुरू झालं आहे. त्यामुळे, बुथ प्रमुखांपासून ते प्रिसायडींग ऑफिसर व पोलीस यंत्रणाही संबंधित बुथवर जाऊन पाहणी करत आहे. उद्या २० मे रोजी मतदान केंद्रांवर मतदारांची गैरसोय होऊ नये म्हणून आवश्यक ती खबरदारी प्रशासनाकडून घेतली जात आहे. मात्र, याच दरम्यान, मुंबईतील वडाळा विधानसभा मतदारसंघा अतिशय दु:खद घटना घडली आहे. येथील बुथ क्रमांक १८९ मधील प्रिसायडींग ऑफिसरचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. मुंबईतील ३० मुंबई दक्षिण-मध्य लोकसभा मतदार संघात आज रोजी, १८० वडाळा विधानसभा मतदार संघ झोन २० मधील बूथ क्रमांक १८९ सेंट पॉल मुलांची शाळा येथे प्रिसायडिंग ऑफिसरचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. निवडणूक अधिकाऱ्यांकडून प्रियायडिंग ऑफिसर म्हणून नेमणूक करण्यात आलेल्या सुनील लक्ष्मण गवळी (वय वर्ष ५६) यांना अचानक छातीत दुखून ते बेशुद्ध पडले होते. त्यानंतर, पोलिसांच्या मदतीने त्यांना तत्काळ केईएम रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, त्यांच्यावर तातडीचे उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाल्याची दु:खद घटना घडली आहे. दरम्यान, मुंबई दक्षिण-मध्य लोकसभा मतदारसंघात महायुतीचे राहुल शेवाळ विरुद्ध अनिल देसाई यांच्यात थेट लढत होत आहे.

### होमगार्डला हृदयविकाराचा झटका

दुसरीकडे अँटॉप हिल पोलीस ठाणे येथे निवडणूक बंदोबस्त करता असणारे होमगार्ड बक्कल नंबर ८२ ३६/ विजय रूपसिंग राठोड (वय २९ वर्ष) राठी सैदापूर तालुका, जिल्हा सातारा यांना शनिवारी रात्री सौम्य हृदयविकाराचा झटका आला. त्यानंतर, राठोड यांना तत्काळ सायन रुग्णालय येथे उपचारासाठी नेण्यात आले. यावेळी, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना तपासून अतिदक्षता विभाग येथे अंतर रुग्ण म्हणून दाखल करण्यात आले आहे. सदर होमगार्ड यांच्या नातेवाईकांशी संपर्क साधण्यात आला आहे. तसेच, सदर होमगार्ड यांच्या प्रकृतीवर सायन रुग्णालयातील स्टाफ व पोलीस प्रशासनही लक्ष ठेवून आहे.

### २२,१०० पोलीस तैनात

लोकसभा निवडणूक २०२४ च्या ५ व्या टप्प्यांतील मतदान २० मे रोजी होणार असून बृहन्मुंबई शहरामध्ये कायदा व सुव्यवस्थेच्या अनुशंगाणे मुंबई पोलीस दलाकडून ५ अपर पोलीस आयुक्त, २५ पोलीस उपआयुक्त, ७७ सहायक पोलीस आयुक्त यांच्यासह २४७५ पोलीस अधिकारी व २२,१०० पोलीस अंमलदार व ०३ दंगल काबु पथक बंदोबस्तकामी तैनात करण्यात आलेले आहेत. राजधानी मुंबईतील ६ लोकसभा मतदारसंघात मतदान होत आहे. त्याच पार्श्वभूमीवर तगडा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. त्यासाठी राज्याच्या विविध भागातून पोलिसांची आगाऊ कुमूक मागविण्यात आली आहे.

# मुंब्रातील वादग्रस्त शाखेला मुख्यमंत्री शिंदेंची भेट

**ठाणे : शिवसेनेमध्ये दोन गट पडल्यानंतर मुंब्रा येथील शिंदे गटाच्या शिवसेनेच्या वतीने शाखेवरती ताबा घेण्यात आला होता. त्यानंतर मोठ्या प्रमाणात त्या मुंब्रातील शाखेवरती आपल्याला पाहायला भेटला होता. विशेष म्हणजे मुंब्रातील या शाखेला ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे त्याचबरोबर विरोधी पक्षाचे अनेक नेत्यांनी देखील भेट दिली होती. परंतु आज पहिल्यांदाच राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या वादग्रस्त शाखेला भेट दिली आहे. आम्ही समाजातील प्रत्येक घटकासाठी आम्ही काम केलं आहे. त्यामुळे समाजातील प्रत्येक घटक आपल्या सोबत आहे, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.**

### मतदान लोकशाहीचा हा पवित्र अधिकार आहे

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, मतदान लोकशाहीचा हा पवित्र अधिकार आहे,त्यामुळे आपण सर्वांनीच मतदानाचा हक्क बजावला पाहिजे. सर्वांना विकास हवा आहे आणि विकास करणार,आमचा सरकार आहे. आमचा अजेंडा हा विकासाचा आहे. टोरेंट विद्युत कंपनी बाबत अनेक तक्रारी मला कळाल्या आहेत, आमचं सरकार सामान्य नागरिकांसोबत आहे. निवडणुका होताच टोरंट बाबत आम्ही बैठक घेऊन लोकांच्या हिताचा निर्णय घेऊ, असेही शिंदे यांनी सांगितले आहे.

### शिंदेचा दौरा महत्त्वाचा मानला जात आहे

कल्याण लोकसभेत समावेश असलेला मुंब्रा एक महत्वाचा विधानसभा मतदारसंघ आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड या मतदारसंघाचे आमदार आहेत. त्यामुळे एकनाथ शिंदेंसाठीही हा मतदारसंघ महत्वाचा आहे. ठाणे आणि कल्याण लोकसभा मतदारसंघासाठी मतदान सोमवारी पार पडणार आहे. त्यामुळे शिंदेंचा दौरा महत्वाचा मानला जातोय.

# ठाणे जिल्ह्यात १५ हजाराच्या आसपास फौजफाटा...

## ठाणे, भिवंडी, कल्याण रडारवर


## जिल्ह्यात मतदानासाठी एसआरपीएफ, सीआयएसएफ, बीएसएफ कंपन्या तैनात

## राहणार पोलिसांची करडी नगर...

**ठाणे - ठाणे पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीतील मतदान प्रक्रिया शांततेत आणि पारदर्शक पद्धतीने पार पडाव्या कुठलाही अनुचित प्रकार घडू नये आणि कडा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी ठाणे पोलिस आयुक्त कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात राज्य राखीव पोलिस दलासह मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. सोमवार (ता-२० मे) रोजी होणार्या मतदानासाठी १५ हजारपेक्षा अतिरिकत पोलिस बंदोबस्त राहणार असलायची माहिती पोलिस सूत्रांनी दिलेली आहे. तर ठाणे, कल्याण आणि भिवंडी हे तीन लोकसभा मतदार संघावर पोलिसांची करडी नगर राहणार आहे.**

राज्यातील ५ व्या टप्प्याच्या मतदान प्रक्रियेत एकूण १३ लोकसभा मतदार संघात मतदान होणार आहे. यामध्ये मुंबईतील सहा आणि ठाणे जिल्ह्यातील ठाणे, भिवंडी आणि कल्याण मतदार संघात मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. यामध्ये मुख्यमंत्र्यांच्या बालेकिल्ला असलेल्या ठाणे लोकसभा मतदार संघाचा समावेश असल्याने पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आलेले आहे. ठाणे लोकसभा मतदार संघातील नवी मुंबई परिसरातील बेलापूर आणि ऐरोली विधानसभा मतदारसंघात मोठा बंदोबस्त ठेवण्यात आल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली. ठाणे लोकसभा मतदारसंघामधील नवी मुंबई परिसरता एकूण १४४ वरिष्ठ अधिकारी, १ हजार ७४१ अंमलदार, ८१९ होमगार्ड, एसआरपीएफचे ६०० जवान असा एकूण ४ हजारांपेक्षा अधिक फौजफाटा निवडणुकीसाठी सज्ज असल्याची माहिती उपलब्ध आहे.

**एकूण 4000 पेक्षा अधिक फौजफाटा निवडणुकीसाठी सज्ज**




### एसआरपीएफ , सीआयएसएफ, बीएसएफ कंपन्या तैनात

ठाणे शहर परिमंडळ-१ मध्ये सातारा, पुणे शहरामधून केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या (सीआयएसएफ) तीन कंपन्या तर राज्य राखीव दलाची एक कंपनी तैनात केली आहे. परिमंडळ-२ मध्ये भिवंडीत सीआयएसएफच्या पुणे आणि धाराशिवच्या चार कंपन्या आहेत. तर, परिमंडळ-३ कल्याणमध्ये सीमा सुरक्षा दलाच्या रत्नागिरी आणि धाराशिव-१, , कर्नाटक-१, आणि पुणे ग्रामीण-१, अशा पाच कंपन्या तैनात करण्यात आहेत. तर, उल्हासनगर परिमंडळामध्ये सिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि पुणे ग्रामीणच्या चार एसआरपीएफ तसेच बीएसएफच्या कंपन्या राहणार राहणार आहेत. तर, वागळे इस्टेट परिमंडळ-५ मध्ये कोल्हापूर आणि पुणे ग्रामीणच्या रेल्वे सुरक्षा दल, बीएसएफ आणि राज्य राखीव दल अशा तीन कंपन्या तैनात करण्यात आलेल्या आहेत. याशिवाय, ठाणे, कल्याण, उल्हासनगर आणि वागळे इस्टेट या चार परिमंडळांमध्ये प्रत्येकी एक, तर भिवंडीमध्ये दोन अशा सहा एसआरपीएफच्या प्लाटून आहेत. यामध्ये ठाणे ग्रामीण पोलिसांच्याही चार हजारांहून अधिक अधिकारी आणि कर्मचारी यांची भर राहणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. हा संपूर्ण फौजफाटा मतदान केंद्र आणि इव्हीएम मशिन असलेल्या स्ट्रॉगरूमच्या ठिकाणी राहणार आहे.

### ठाणे, कल्याण, भिवंडीत अतिरिक्त बंदोबस्त

ठाणे शहर पोलिस आयुक्तालयात सध्या पोलिस आयुक्त आशुतोष डुंबरे, सह पोलिस आयुक्त डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण यांच्यासह चार अतिरिक्त पोलिस आयुक्त, सात पोलिस उपायुक्त यांच्यासह आठ हजार पोलिसांचे संख्याबळ आहे. त्याशिवाय, आता तिन्ही लोकसभा मतदारसंघांमध्ये बाहेरील जिल्ह्यांमधून अतिरिक्त तीन पोलिस उपायुक्त, ९ सहायक पोलिस आयुक्त आणि १९ पोलीस निरीक्षक, तसेच नाशिक प्रशिक्षण केंद्रातील ८० प्रशिक्षण उपनिरीक्षक, पिंपरी- चिंचवड मधील ६९० पोलीस अंमलदार, ३ हजार ४९१ होमगार्ड असा सात हजारांहून अधिकचा फौजफाटा तैनात करण्यात येणार असलायची माहिती उपलब्ध आहे.

### एसआरपी आणि केंद्रीय राखीव पोलिसांच्या २५ कंपन्या

ठाणे जिल्ह्यात राज्य राखीव दलासह केंद्रीय राखीव पोलिसांच्या २५ कंपन्या राहणार आहेत. यातील एका कंपनीत १२० पोलीस कर्मचारी असल्यामुळे सुमारे तीन हजारांहून अधिकचा फौजफाटा तैनात करण्यात येणार आहे. ठाणे पोलिसांचा चोख बंदोबस्ताशिवाय ठाणे, कल्याण आणि भिवंडी या मतदार संघावर पोलिसांची करडी नजर राहणार आहे.

भिवंडी लोकसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या खर्चाबाबत

# केंद्रीय निवडणूक निरीक्षक (खर्च) यांच्या उपस्थितीत तिसरी खर्च तपासणी




भिवंडी : २३ भिवंडी लोकसभा मतदारसंघासाठी जाहीर केलेल्या वेळा पत्रकानुसार उमेदवारांचा निवडणूक खर्चाबाबतची तिसरी तपासणी केंद्रीय निवडणूक निरीक्षक (खर्च) चित्तरंजन धंगडा माझी याच्या उपस्थितीत महापालिका मुख्यालयात दिनांक १८/०५/२०२४ रोजी पार पडली. सदर तपासणीच्या वेळी एकूण २७ उमेदवारांपैकी २६ उमेदवारांनी आपला निवडणूक खर्चा संबंधीचे लेखे केंद्रीय निवडणूक निरीक्षक (खर्च) यांच्याकडे सादर केले असून १ उमेदवार गैरहजर होता. १ उमेदवाराचे खर्चामध्ये तफ़ावत असल्याने मा. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे गैरहजर उमेदवारास व खर्चात तफावत असलेल्या असे एकूण २ उमेदवारास नोटीस बजावण्याची कारवाई करण्यात आलेली आहे. खर्च सादर केलेल्या उमेदवारांचा खर्च विषयक तपशील केंद्रीय निवडणूक आयोगाच्या संकेत स्थळावर तसेच २३ भिवंडी लोकसभा निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय येथील नोटीस बोर्डवर उपलब्ध आहेत.

# मतदानासाठी 12 प्रकारचे ओळखीचे पुरावे ग्राह्य

## जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांची माहिती

ठाणे (गणेश भोईटे) : मतदान करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने मतदार छायाचित्र ओळखपत्राव्यतिरिक्त इतर १२ प्रकारची कागदपत्रे ओळखीचे पुरावे म्हणून ग्राह्य धरले असून त्यापैकी कोणताही एक पुरावा दाखविल्यानंतर संबंधितांना मतदान करता येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनागारे यांनी दिली आहे. ठाणे जिल्ह्यात लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीअंतर्गत २० मे २०२४ रोजी २३ भिवंडी, २४ कल्याण व २५ ठाणे या तीन लोकसभा मतदारसंघात मतदान होणार आहे. छायाचित्र असलेले मतदार ओळखपत्र असलेल्या मतदारांना मतदान केंद्रावर ओळख पटविण्यासाठी मतदार ओळखपत्र सादर करता येईल.




छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करू शकणार नाहीत, अशा मतदारांची ओळख पटविण्यासाठी निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या १२ कागदपत्रांपैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहे.

### प्रवासी भारतीयांना मूळ पासपोर्ट आवश्यक

पारपत्र (पासपोर्ट), वाहन चालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), केंद्र अथवा राज्य शासन, तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना वितरित केलेले छायाचित्र ओळखपत्र, बँक किंवा टपाल विभागातर्फे छायाचित्रासह वितरित करण्यात आलेले पासबुक, पॅन कार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अंतर्गत भारतीय महानिबंधक आणि जनगणना आयुक्तांनी जारी केलेले स्मार्ट कार्ड, मनरेगा अंतर्गत निर्गमित करण्यात आलेले रोजगार ओळखपत्र, निवृत्तीवेतनाचे दस्तावेज, संसद, विधानसभा, विधानपरिषदेच्या सदस्यांना वितरित केलेले अधिकृत ओळखपत्र, आधार कार्ड, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तिकरण मंत्रालयाच्यावतीने दिव्यांग व्यक्तींना वितरित केलेले विशेष ओळखपत्र, कामगार मंत्रालयाद्वारा वितरित आरोग्य विमा स्मार्ट कार्ड ही १२ कागदपत्रे पुरावे म्हणून मतदानासाठी ग्राह्य धरली जाणार आहेत. प्रवासी भारतीयांना त्यांची ओळख पटविण्यासाठी त्यांचा मूळ पासपोर्ट आवश्यक असणार आहे.

सर्व नोंदणीकृत मतदारांना मतदान केंद्र, यादी भाग क्रमांक, मतदानाची तारीख, वेळ आदी माहितीच्या चिठ्ठ्यांचे निवडणूक कार्यालयाकडून वितरण करण्यात येत आहे. मतदारांनी मतदान केंद्रावर जाताना मतदार माहिती चिठ्ठी आणि छायाचित्र ओळखपत्र सोबत न्यावे, असे आवाहनही जिल्हा निवडणूक प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

### आपल्या मतदान केंद्राविषयी जाणून घ्या

■ २३ भिवंडी लोकसभा मतदारसंघांतर्गत १३४ – भिवंडी ग्रामीण (अ.ज), १३५ – शहापूर (अ.ज.), १३६ – भिवंडी पश्चिम, १३७ – भिवंडी पूर्व, १३८ – कल्याण पश्चिम, १३९– मुरबाड या विधानसभा मतदारसंघांचा समावेश आहे.

■ २४ कल्याण लोकसभा मतदारसंघांतर्गत १४० – अंबरनाथ (अ.जा.), १४१ – उल्हानगर, १४२ – कल्याण पूर्व, १४३ – डोंबिवली, १४४ – कल्याण पश्चिम, १४९– मुंब्रा कळवा या विधानसभा मतदारसंघाचा समावेश आहे.

■ २५ ठाणे लोकसभा मतदारसंघांतर्गत १४५ – मिरा भाईंदर, १४६ – ओवळ माजिवाडा, १४७– कोपरी पाचपाखाडी, १४८– ठाणे, १५०– ऐरोली, १५१– बेलापूर या विधानसभा मतदारसंघाचा समावेश आहे.

■ जिल्ह्यातील तीनही लोकसभा मतदारसंघांच्या क्षेत्राचा विस्तार लक्षात घेता नागरिकांनी मतदानापूर्वी आपल्या मतदान केंद्राची माहिती घ्यावी. निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर किंवा पद्वारेही ही माहिती मिळू शकेल. मतदारांना वितरीत करण्यात येणाऱ्या मतदार माहिती चिठ्ठीद्वारेदेखील कुठे मतदान करावयाचे आहे ते कळू शकेल.

■ मतदारांनी मतदार ओळखपत्र किंवा वरीलपैकी एक ओळखीचा पुरावा सोबत ठेवून मतदानाचा हक्क बजवावा आणि लोकशाहीच्या या उत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. शिनगारे यांनी केले आहे.

# विक्रेत्यांचा ग्राहकांवर हल्ला

ठाणे : केळी विक्रेत्याकडून केळी खरेदी करताना एक केळ अधिकचे घेतल्याने विक्रेता आणि त्याच्या मुलाने ग्राहकांवर रॉडने हल्ला करून मारहाण केल्याचा गंभीर प्रकार भिवंडीत उघडकीस आला आहे. याप्रकरणी केळी विक्रेता राम गुप्ता (४४) आणि त्याचा मुलगा संजय गुप्ता (१९) यांच्याविरोधात नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी रविवारी त्यांना अटक केली आहे.

भिवंडी येथील कामतघर भागात राहणारा तरूण त्याच्या मित्रासह शनिवारी सायंकाळी नारपोली येथील हनुमान मंदिर परिसरातून पायी जात होते. त्यावेळी केळी विक्रेता राम हा त्याच्या हातगाडीवर तेथे केळी विक्री करत होता. तरूणाने त्याच्याकडून अर्धा डजन केळी विकत घेतली. त्यावेळी तरूणाच्या मित्राने एक केळ जास्त घेतले. त्याचा राग आल्याने राम याने त्याला धक्का दिला. एका केळ्याचे पैसे अधिक घे परंतु धक्काबुक्की करू नको असे त्याने रामला खडसावले. त्यानंतर राम याने मोठ्याने शिवीगाळ करण्यास सुरूवात केली.

दरम्यान, राम याचा मुलगा संजय हा त्याठिकाणी आला. त्याने घडलेला प्रकार राम याला विचारला. त्यानंतर संजय याने हातगाडीखाली ठेवलेला लोखंडी रॉड बाहेर काढला. त्यानंतर त्याने दोघांनाही जीवंत सोडणार नाही असे धमकावत तरूणाच्या मित्राच्या डोक्यात रॉड मारला. त्यावेळी तरूण मित्राच्या बचावासाठी गेला असता, त्याच्याही डोक्यात रॉड मारण्यात आला. पुन्हा संजय हा त्या तरूणांना रॉड मारत असताना त्याचा रॉड त्यांनी पकडला. त्यावेळी संजय याने तरूणाच्या हाताला चावा घेतला. या घटनेनंतर तरूणाने राम आणि संजय यांच्याविरोधात नारपोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीनंतर पोलिसांनी संजय आणि राम या दोघांना ताब्यात घेऊन अटक केली आहे.

# २५ ठाणे लोकसभा मतदारसंघातील नाविन्यपूर्ण मतदार केंद्रे

ठाणे : ठाणे जिल्ह्यात उद्या दि २० मे २०२४ रोजी लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या मतदानासाठी २५- ठाणे लोकसभा मतदारसंघाची मतदान प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी संपूर्ण यंत्रणा सज्ज झाली आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी मतदान करावे असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. २५ ठाणे लोकसभा मतदारसंघात सखी, दिव्यांग आणि युवा ही नाविन्यपूर्ण मतदान केंद्रे तयार करण्यात आली आहेत.

सखी मतदान केंद्रे : १४५ मीरा भाईंदर विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्र क्र. ४३६ (रॉयल कॉलेज), १४६ ओवळा माजिवडा विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्र क्र. ४३९ (श्रीमती सुलोचनादेवी सिंघानिया हायस्कूल, पोखरण रोड नं. २ तळमजला), १४७ कोपरी पाचपाखाडी विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्र क्र. १९९ (नेपच्यून एलिमेंट आयटी पार्क, ओपन स्पेस पार्टीशन १ रोड नं. २२ वागळे इस्टेट, ठाणे), १४८ ठाणे विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्र क्र. २६५ (एनकेटी महाविद्यालय, खारकर आळी, तळमजला सभागृह ठाणे), १५० ऐरोली विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्र क्र. १५२ (सरस्वती हायस्कूल, तळमजला, सेक्टर ५, ऐरोली), १५१ बेलापूर विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्र क्र. १२४ (सेव्हनडे डव्हेटेन्ज हायर सेकंडरी स्कूल,सेक्टर ८ सानपाडा) येथे सखी मतदान केंद्रे असणार आहेत.

दिव्यांग मतदान केंद्रे- १४५ मीराभाईंदर विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्र क्र. १९१ (बिशॉप इंटरनॅशनल स्कूल), १४६ ओवळा माजिवडा विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्र क्र. ३२६ (टीएमसी जिद्द शाळा, तळमजला वसंतविहार, ठाणे ) १४७ कोपरी पाचपाखाडी विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्र क्र. ३०६ (विठ्ठल रुक्मिणी सेवा संघ, कमल तलावासमोर, पार्टीशन नं २ गांधी नगर रोड, गांधीनगर ठाणे), १४८ ठाणे विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्र क्र. २८३ (सरस्वती एज्युकेशन सोसायटी हायस्कूल, तळमजला, पाचपाखाडी), १५० ऐरोली विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्र क्र. १४१ (दत्ता मेघे वर्ल्ड कॅडमी ग्राऊंड फ्लोअर, ऐरोली सेक्टर १६), १५१ बेलापूर विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्र क्र. २०५ (स्किल अ‍ॅण्ड बॅलीटी बॉईज स्कूल, सेक्टर ११ प्लॉट नं. ९ नेरुल नवी मुंबई) येथे ती असणार आहेत.

युवा मतदान केंद्रे – १४५ मिराभाईंदर विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्र क्र. १९६ (भाईंदर सेकंडरी स्कूल, तळमजला रुम नं १), १४६ ओवळा माजिवडा विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्र क्र. ३३२ (शिवाई विद्यालय, शिवाई नगर, ठाणे) १४७ कोपरी पाचपाखाडी विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्र क्र. १७० (ठाणे मॅन्युफॅक्चर असोसिएशन, जे.के. ऑडीटोरीयम हॉल, वागळे इस्टेट ठाणे), १४८ ठाणे विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्र क्र. ३५३ (विद्याप्रसारक मंडळ कॉमर्स न्ड आर्टस कॉलेज, बि नं ३, बांदोडकर कॉलेज ऑफ कॉमर्स, ठाणे ), १५० ऐरोली विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्र क्र. १६९ (जमनाबाई जनार्दन माधवी नवी मुंबई महापालिका शाळा क्र ४८ तळमजला, सेक्टर ७ दिवा गांव ऐरोली), १५१ बेलापूर विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्र क्र. २८ (कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, वाशी) येथे तयार करण्यातआली आहेत.

# निवडणूक कामासाठी एस. टी. बस सोडली : प्रवाशांचे हाल

कल्याण: लोकसभा निवडणूक कामासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बस निवडणूक आयोगाने घेतल्याने या बसच्या माध्यमातून विविध शहरे, आपल्या गावी जाणाऱ्या प्रवाशांचे मागील दोन दिवसांपासून हाल सुरू आहेत. अनेक प्रवाशांनी दोन ते तीन महिने अगोदर एस. टी. बसचे गावी जाण्यासाठी आरक्षण करून ठेवले आहे. अशा प्रवाशांनाही बस वेळेवर उपलब्ध न होण्याचा फटका बसत आहे. ठाणे, मुंबई पट्ट्यात सोमवारी, २० मे रोजी मतदान होत आहे. या निवडणूक कामासाठी खासगी, शालेय बस बरोबर राज्य परिवहन महामंडळाच्या एस. टी. बसही निवडणूक कर्मचारी, सामान वाहतुकीसाठी घेण्यात आल्या आहेत. कल्याण, विठ्ठलवाडी, ठाणे, भिवंडी, शहापूर, मुरबाड बस आगारांमधील बस या कामांसाठी तैनात करण्यात आल्या आहेत. त्यामुळे आगार व्यवस्थापकांना उपलब्ध बसच्या माध्यमातून स्थानिक आणि लांब पल्ल्याच्या बस सोडाव्या लागत आहेत. या बस सोडताना आगार व्यवस्थापकांना मोठी कसरत करावी लागते.

# भिवंडी महानगरपालिकेच्यावतीने सर्व मतदान केंद्राजवळ स्वच्छता साफसफाई करण्याचे निर्देश तसेच, मतदान केंद्र व मतदान दर्शक फलक

भिवंडी : २३,भिवंडी लोकसभा मतदारसंघ अंतर्गत भिवंडी महापालिका क्षेत्रात दोन विधानसभा मतदारसंघ येत आहे यामध्ये भिवंडी पूर्व आणि पश्चिम या दोन्ही ठिकाणी महापालिकेच्या वतीने मतदारांकरता वेगवेगळ्या सोयी सुविधा पुरविण्यात येत आहेत मतदान केंद्राच्या जवळ साफसफाई स्वच्छता, मतदान केंद्रावर जाण्याचा मार्ग तात्पुरती दुरुस्त करणे, मतदान केंद्रावर शाळेत रॅम्प, किरकोळ दुरुस्ती , लाईट, पाणी, फिरते शौचालय याची व्यवस्था देखील करण्यात आली आहे, त्याचबरोबर मतदारांच्या सोयी करता शहरात महत्त्वाच्या चौकात आणि रस्त्यावर मतदान केंद्र क्रमांक आणि मतदान केंद्राकडे जाण्याचा मार्ग असे फलक देखील दर्शनी भागात लावण्यात आलेले आहेत. पालिकेच्या वतीने पालिकेच्या सर्व शाळा या ठिकाणी सर्व पुरेशा सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मतदान केंद्राच्या स्वच्छतेचे बाबत पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी सर्व आरोग्य विभागाला सूचना केलेल्या आहेत हे मतदान केंद्राचा आजूबाजूचा परिसर स्वच्छ आणि त्या ठिकाणी औषध फवारणी करणे, जंतुनाशक पावडर मारणे इत्यादींची व्यवस्था करण्यात येत आहे.







# वाढदिवसानिमित्त माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव



पनवेल : हसतमुख स्वभाव, सर्वांना बरोबर घेवून काम करणारे व्यक्तीमत्त्व, राजकारणापेक्षा समाजसेवेला महत्व देणारे, सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा आदी भरगच्च क्षेत्र असे संतुलन साधत आपल्या व्यक्तीमत्वाने अल्पावधीत मोठे यश संपादन करून समाजामध्ये नावलौकीक प्राप्त करणारे पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांचे आज वाढदिवसानिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते हितचिंतकांनी अभिष्टचिंतन केले.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व कर्तव्यदक्ष कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांचा राजकीय व सामाजिक कतत्वाचा वसा अंगी बाळगत सामाजिक, कला, क्रीडा तसेच राजकारण व उद्योजकता क्षेत्रात यशाची अनेक शिखरे परेश ठाकूर यांनी पादाक्रांत केली आहेत. लोकनेते रामशेठ ठाकूर यांची दानशूरवत्ती, आमदार प्रशांत ठाकूर यांचे मार्गदर्शन परेश ठाकूर यांना नेहमी प्रेरक ठरले. तारूण्यातील सळसळते रक्त उत्साह समाजाच्या सेवेत खर्ची घालत त्यांनी आपल्या कार्याची चुणूक दाखवून दिली असून युवकांमध्ये राष्ट्रीय एकात्मता रुजविण्यासाठी त्यांनी तरुणांची मजबूत फळी तयार केली आहे. युवकांचे आदर्श स्थान म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.

# देशासाठी सैनिक करतात बलिदान, तुम्ही करा ना मतदान : मनोज सानप

ठाणे : देशासाठी सैनिक करतात बलिदान... तुम्ही करा ना मतदान .. असा संदेश मतदान जनजागृती करण्यासाठी एकपात्री प्रयोगाच्या माध्यमातून आज जिल्हा नियोजन समिती सभागृहात संवाद मतदारांचा... संकल्प मतदानाचा या सुसंवाद कार्यक्रमात ठाणे जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप यांनी मतदारांना दिला.

देशाच्या सीमेवर सैनिक आपले रक्षण करीत असल्यामुळे आज आपण इथे सुरक्षित आहोत. ऊन, वारा, पाऊस यांची तमा न बाळगता प्रत्येक सैनिक डोळ्यात तेल घालून आपले रक्षण करीत आहेत. सैनिक देशासाठी बलिदान देत आहेत..आपण निदान मतदान तरी करावे, असा संदेश या एकपात्री प्रयोगाच्या माध्यमातून मनोज शिवाजी सानप यांनी दिला.

सीमेवर देशाचे रक्षण करताना शहीद कॅप्टन विनायक गोरे यांच्या मातोश्री अनुराधा गोरे या वीरमातेची गाथा त्यांनी आपल्या एकपात्री अभिनयातून उभी केली. देशासाठी सैनिक म्हणून मुलाचे बलिदान हा अभिमान आणि दुसरीकडे मुलगा गमावल्याचे आईचे दु:ख हा प्रसंग एका वीरमातेच्या भूमिकेतून त्यांनी साकारला. आज सीमेवर सैनिक रक्षण करताना आपल्या प्राणाचे बलिदान देत आहेत, मग आपल्याला तर फक्त मतदान करावयाचे आहे, असे आवाहन करीत मतदान नक्की करा आणि आपली भारतीय लोकशाही बळकट करा, हे असे आवाहन वीरमाता मतदारांना करीत असल्याचा प्रसंग मनोज सानप यांनी साकारला.

# ३३२५ मतदान केंद्राचे होणार वेबकास्टिंग

ठाणे : ठाणे जिल्ह्यातील २३ भिवंडी, २४ कल्याण व २५ ठाणे या लोकसभा मतदारसंघात एकूण सुमारे ६६ लाख ७८ हजार ४७६ मतदारांना येत्या २० मे २०२४ रोजी मतदानाचा हक्क बजावता येणार आहे. मतदानासाठी जिल्ह्यात तीनही लोकसभा मतदारसंघ मिळून एकूण ६६०४ मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत. यामध्ये ३६ मतदान केंद्रे ही सोसायट्यांच्या क्लब हाऊसमध्ये असणार आहेत.

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या मतदानासाठी ठाणे जिल्ह्यात संपूर्ण तयारी करण्यात आली आहे. जिल्ह्यातील तीनही लोकसभा मतदारसंघात मतदानासाठी विविध सुविधा निर्माण करण्यात आली आहे. जिल्ह्यात सर्व विधानसभा मतदारसंघात मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत. सुलभ निवडणूक संकल्पनेनुसार ही सर्व मतदान केंद्रे तळमजल्यावर आणण्यात आली आहेत. या मतदान केंद्रांमध्ये मतदारांसाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा, स्वच्छतागृह, उन्ह लागू नये म्हणून सावलीची व्यवस्था, रॅम्प, व्हिलचेअर आदी सुविधा पुरविण्यात येणार आहेत.

ठाणे जिल्ह्यात एकूण ६६०४ मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत. भिवंडी लोकसभा मतदारसंघात एकूण २१९१ केंद्रे आहेत. यात १३४ – भिवंडी ग्रामीण (अ.ज) – ३४५ मतदान केंद्रे, १३५ – शहापूर (अ.ज.) – ३२६ मतदान केंद्रे, १३६ – भिवंडी पश्चिम – २९७ मतदान केंद्रे, १३७ – भिवंडी पूर्व – ३१४ मतदान केंद्रे, १३८ – कल्याण पश्चिम – ३९८ मतदान केंद्रे, १३९– मुरबाड – ५११ मतदान केंद्रांचा समावेश आहे.

२४ कल्याण लोकसभा मतदारसंघात एकूण १९६० मतदान केंद्रे असून यामध्ये १४० – अंबरनाथ (अ.जा.) – ३१९ मतदान केंद्रे, १४१ – उल्हानगर– २५१ मतदान केंद्रे, १४२ – कल्याण पूर्व – ३२१ मतदान केंद्रे, १४३ – डोंबिवली – २६९ मतदान केंद्रे, १४४ – कल्याण पश्चिम – ४०६ मतदान केंद्रे, १४९– मुंब्रा कळवा – ३९४ मतदान केंद्रे एवढी संख्या आहे.

महिला, युवा, दिव्यांग या नाविन्यपूर्ण मतदान केंद्रावर होणार मतदान

# भिवंडीतील मतदान केंद्रावर होणार आगरी कोळी संस्कृतीचे दर्शन



ठाणे : २० मे २०२४ रोजी होत असलेल्या लोकसभा २०२४ निवडणुकांसाठी संपूर्ण जिल्हा प्रशासन यंत्रणा सज्ज झाली आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून विविध शासकीय आस्थापनांचे अधिकारी कर्मचारी मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी मेहनत घेत असून महिला, युवा व दिव्यांग मतदान केंद्र एकसारखी असावीत यासाठी नाविन्यपूर्ण मतदान केंद्रे तयार करण्यात येत असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी अशोक शिनगारे यांनी दिली.

ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदार संघामध्ये प्रत्येकी १ या प्रमाणे १८ केंद्रे सखी मतदान केंद्रे, १८ युवा मतदान केंद्रे, १७ दिव्यांग केंद्रे व काही मतदान केंद्रे हे आगरी -कोळी संस्कृतीचे दर्शन घडविणारी करण्यात येणार आहे.

महिला मतदान केंद्रावर संपूर्ण पथक हे महिलांचे असणार आहे. मतदान केंद्राध्यक्ष,तीन मतदान अधिकारी, शिपाई म्हणून महिला कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. सदर केंद्रासाठी थीम गुलाबी रंग ठरविण्यात आली आहे. यामध्ये महिला मतदान केंद्रामध्ये पडदे, कारपेट, फुगे, झालर, रांगोळी, सेल्फी बुथ, मतदान केंद्राचे प्रवेशद्वार तसेच मतदान केंद्रामध्ये नियुक्त सर्व महिला कर्मचारी यांनी गुलाबी रंगाचे वस्त्र परिधान केलेले असतील. मतदान केंद्रामधील मंडपामध्ये भारतातील वेगवेगळया क्षेत्रामध्ये प्राविण्य मिळविलेल्या महिलांचे फोटो लावण्यात येणार आहेत.

युवा मतदान केंद्रावर सर्व युवा कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. सदर केंद्रासाठी पिवळा रंग ठरविण्यात आला आहे. मतदान केंद्रामध्ये पडदे, कारपेट, फुगे, झालर, रांगोळी, सेल्फी बुथ, मतदान केंद्राचे प्रवेशद्वार तसेच मतदान केंद्रामध्ये नियुक्त सर्व युवा कर्मचारी यांनी पिवळया रंगाचे वस्त्र (टिशर्ट/ शर्ट) परिधान केलेले असतील. मतदान केंद्रामधील मंडपामध्ये भारतातील वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये प्राविण्य मिळविलेल्या युवा यशस्वी उद्योजक, खेळाडू, शास्त्रज्ञ, अभिनेता यांचे फोटो लावण्यात येणार आहेत.

भावपुर्ण श्रध्दांजली



तव स्मरण हृदयी निरंतर
आठवणी रडवतील, काहीच न बोलता
आठवणी निघुनही जातील...!
तरीही आयुष्यात तुमच्या आठवणी मात्र
कायम राहतील...!

कै. भिमाबाई केशव पाटील
जन्म ०१/०६/१९३३ (९२ वर्ष )
यांचे मंगळवार दि. १४/०५/२०२४ रोजी दुःखद निधन झाले, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो. हिच ईश्वर चरणी प्रार्थना.

दशक्रिया विधी
गुरुवार दि. २३/०५/२०२४ रोजी, स्थळः पारसिक रेतीबंदर येथे सकाळी ८.०० वाजता.

दिवसकार्य
शुक्रवार दि. २४/०५/२०२४ रोजी, स्थळः केशव दीप बंगला राहत्या घरी सकाळी ११.००वा. होईल.

शोकाकुळ
कै. दिलीप(शेठ) केशव पाटील (मुलगा)
श्री. कमलाकर केशव पाटील (मुलगा)
सौ. शांता गुरुनाथ म्हात्रे (मुलगी)
सौ. कुसुम नंदकुमार साळवी (मुलगी)
सौ. जयश्री दत्तात्रय म्हात्रे (मुलगी)
सौ. राजेश्री विजय म्हात्रे (मुलगी)
सौ. मालती विश्वनाथ बुंदे (मुलगी)
कु. अक्षय कमलाकर पाटील (नातू )
कु. कौस्तुभ कमलाकर पाटील (नातू )

समस्त पाटील परिवार
टिप : कोणत्याही प्रकारचा दुःखवटा स्विकारला जाणार नाही.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१